

# समाजातील तीन वर्ग (Three Major Classes in the Society)

बंजारा शिक्षण संस्था द्वारा संचलित

## कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड


डॉ.मानवते उत्तम हुसनाजी

प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

# प्रस्तावना

प्लेटोच्या मते काही व्यक्ती शेतीचे कार्य करतात. काही वस्तू तयार करतात तर काही लोक घर बनविण्याचे काम करतात. याचे फळ म्हणजे समाजामध्ये अनेक शिल्पकार तथा कष्टकरी लोक तयार होतात. व्यक्तीच्या गरजांच्या वाढीसोबतच ज्या आवश्यकतांची गरज आहे त्यांची पुर्तता करण्यासाठी सामग्री सुद्धा वाढत जाते. म्हणून ती सामग्री तयार करण्यासाठी समाजात सुतार, लोहार, व्यापारी, चिकित्सक, कारागीर तयार होतात. ते लोक आपापल्या कार्यात तज्ञ बनतात आणि वस्तूंचे उत्पादन जास्त करतात. सारखे एकच कार्य करून ते त्यात जज्ञ बनतात. अशा प्रकारे एक व्यक्ती एक कार्य या व्यवस्थेनुसार श्रम विभागणी होते. याद्वारेच सेवेची देवाण-घेवाण याची सुरुवात होते.

प्लेटोच्या मते मानवी आत्मा हा तीन गुणांचा मिळून बनतो आणि याचे मुख्य सूत्र आहे व्यक्तीचे व्यापकत्व. म्हणजे राज्य म्हणून व्यक्तीमध्ये जी गुणवैशिष्ट्ये आहेत ती तशीच वैशिष्ट्ये राज्यसंस्थेची आढळतात. मानवी आत्म्याचे बाह्य स्वरूप म्हणजे राज्य असेही मन राज्याची मीमांसा करताना प्लेटोने केले आहे. मानवी आत्मा तीन गुणांचा असतो. ते गुण म्हणजे 1) बुद्धी 2) शौर्य किंवा साहस आणि 3) वासना किंवा भूख हे आत्म्याचे तीन गुण असतात. काही व्यक्तींमध्ये बुद्धी हा गुण मोठ्या प्रमाणात आढळून येतो. काही व्यक्तीमध्ये शौर्य किंवा साहस हा गुण जास्त आढळतो तर काही व्यक्तीमध्ये भूक किंवा वासना हा गुण जास्त आढळतो. याचा अर्थ असा की व्यक्तीमध्ये जो गुण जास्त प्रमाणात आढळतो ती व्यक्ती त्या प्रवृत्तीची बनते. ते ती गुण खालीलप्रमाणे आहेत.

## 1.

## प्रशासक वर्ग

ज्या लोकांकडे बुद्धी हा गुण जास्त आहे त्याचा एक वर्ग बनतो. ते प्रशासक वर्गामध्ये सहभागी होतात आणि बुद्धिमान लोकांचेच शासन बनावे असे प्लेटोला वाटते. कारण बुद्धिमान आणि ज्ञानी लोकांचे शासन असेल तर ते लोकच देशाला संकटापासून वाचवू शकतात तसेच शासकवर्ग हा ज्ञानी असल्यामुळे ते निःस्वार्थी भावनेने देशाची सेवा करू शकतात. संपत्ती आणि कुटुंब यांचे त्यांना आकर्षण नसते.

## 2.

## सैनिक वर्ग

ज्या वर्गाकडे साहस किंवा शौर्य हा गुण जास्त असतो त्यांचा सैनिक वर्ग बनतो. या वर्गाचे कार्य देशाचे संरक्षण करणे हे आहे.

# 3.

# उत्पादन वर्ग

ज्या लोकांकडे वासना किंवा भूक जास्त असते ते लोक या वर्गामध्ये येतात. राज्यातील सर्व लोकांची भूक भागविण्याचे कार्य करतात. हा वर्ग शेती, व्यापार आणि व्यवसाय करतो. अन्न, वस्त्र आणि निवारा या समाजाच्या गरजा आहेत त्यांची पुर्तता करण्याचे कार्य उत्पादक वर्ग करतो. शिल्पकार व्यवसायी, कारखानदार, शेतकरी, व्यापारी आणि कलाकार इत्यादी लोक उत्पादक वर्गात मोडतात. वर उल्लेख केल्या प्रमाणे ज्या लोकांकडे जो गुण जास्त असतो ती व्यक्ती तशा प्रकारची बनते आणि तशा प्रकारचे काम करण्याची प्रेरणा मिळत असते. अशी काटेकोर विभागणी झाली असली तरी त्यांच्यामध्ये समन्वय स्थापित होत असतो.

# THANK YOU